महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**परिपत्रक :-**

जा. क्र. : तंशिविकापु/विवि-३/मान्यता/२०२३/१२८०
दिनांक : ०३/०४/२०२३ 03 APR 2023

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पदवी
औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्था (पुणे विभाग)

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता नवीन बी.फार्मसी अभ्यासक्रमांची संस्था सुरु करण्यास फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया नवी दिल्ली यांचे पोर्टलवर ऑन लाईन अर्ज केलेल्या तथा करण्यात येणाऱ्या संस्थांना शासन ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत**

**संदर्भ** :- १. फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया यांनी त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द केलेले परिपत्रक क्र १४-५६ /2023 ( Approval Process for 2023-2024 a.s. New Institutions)-5 दि.०१.०४.२०२३
२. संचालनालयाचे पत्र क्र.०२/एनजीपी/मान्यता-२०२३/३०९ दि.०३.०४.२०२३

उपरोक्त विषयान्वये फार्मसी कौंसिल इंडिया, नवी दिल्ली यांनी त्यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या संदर्भीन परिपत्राकान्वये शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून नवीन औषधनिर्माणशास्त्र संस्था सुरु करण्यासाठी दि. ०३.०४.२०२३ ते दि. ०९.०४.२०२३ या कालावधीत ऑन लाईन अर्ज करण्यासाठी त्यांचे पोर्टल सुरु केले आहे.

फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांनी त्यांचे पोर्टलवरील https://www.pci.nic.in/procedure forms.html या लिंक वर अभ्यासक्रम निहाय **"Schemes"** नमूद केले आहे. या **"Schemes"** मध्ये अनिवार्य असलेल्या दस्तावेजामध्ये बी. फार्मसी अभ्यासक्रमाच्या नवीन संस्थासाठी शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र अनिवार्य आहे. यास्तव या विभागातील ज्या संस्थांनी नवीन बी फार्मसी अभ्यासक्रमाचे नवीन फार्मसी महाविद्यालय सुरु करण्यासाठी फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचेकडे अर्ज केले असतील त्यांना विहित कालमर्यादेत शासन ना-हरकत प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे.

सबब राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्रासाठी दि.२२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले नोंदणी शुल्क डीडी व्दारे **SBI A/C GRAS** या नावाने धनाकर्ष काढण्यात यावे. विहित कामलमर्यादेत या कार्यालयास प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे शासन ना-हरकत प्रमाणपत्र विलंब झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबधित संस्थांची राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- प्रोग्रामर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता